## नि.दि.मु.क्र. १३/२००५ मधील निशाणी ३३५ वरील आदेश

## (बाळकृष्ण येसजी वगैरे वि.चंद्रकांत आरोलकर वगैरे)

**सीएनआयनं.एमएचएसआय-०५-००००४९२००५**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ३ यांना साक्षीसमन्स पाठविण्याकरीता दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जकामी प्रतिवादी यांचे कथन संक्षिप्त रूपात असे की, प्रतिवादी यांनी निशाणी ३३२ येथे पुरशीस दाखल करुन पुरावा बंद केलेला आहे. परंतु दावा विषयक वादाचे निराकरण होण्यासाठी श्रीदेव वेतोबा देवस्थान, आरवली या देवस्थानाचे विश्वस्त समितीचे विद्यमान अध्यक्ष श्री. जयवंत राय यांना प्रतिवादीतर्फे साक्षीदार म्हणून तपासणे आवश्यक आहे. सदर साक्षीदार न तपासल्यास प्रतिवादींचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणारे आहे. प्रतिवादी हे प्रस्तुत साक्षीदाराचा आवश्यक तो साक्षीभत्ता भरण्यास तयार आहेत. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिवादी यांनी केलेली आहे.

३) वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे निशाणी ३३६ येथे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीने त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि.०८/०७/२०१६ रोजी दाखल केले, त्यानंतर अनेक तारखांनंतर प्रतिवादीतर्फे वादीचा दि.१४/११/२०१८ रोजी उलटतपास पूर्ण करण्यात आला व दि.२८/११/२०१८ रोजी वादीने पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली. तद्नंतर प्रतिवादीतर्फे पुरावा देण्यासाठी बऱ्याच तारखा नेमण्यात आल्या व दि. ३०/०७/२०१९ रोजी प्रतिवादीचा मुदतीचा अर्ज नामंजूर करुन प्रतिवादीचा पुरावा बंद करण्यात आला. तद्नंतर दि. १६/१०/२०१९ रोजी प्रतिवादीतर्फे पुरावा बंद केल्याचा आदेश रद्द करण्यात आला व दि. १५/११/२०१९ रोजी प्रतिवादी यांच्या साक्षीदाराचा सरतपास पूर्ण करुन दि.२९/०१/२०२० रोजी उलटतपास पूर्ण करण्यात आला. प्रतिवादी यांनी दि.२६/०२/२०२० रोजी साक्षीदार क्र. २ चे प्रतिज्ञापत्र दाखल केले व सदर साक्षीदाराचा दि.१३/०३/२०२० रोजी उलटतपास पुर्ण करण्यात आला. तद्नंतर अनेक तारखा प्रतिवादींतर्फे पुरावा देण्यासाठी नेमण्यात आल्या. परंतु प्रतिवादी यांनी साक्षीदार न तपासता दि.२३/०८/२०२३ रोजी तोंडी पुरावा द्यावयाचा नाही म्हणून पुरसीस दिली. प्रतिवादी यांना पुरावा देण्यासाठी वेळोवेळी संधी देवूनही प्रतिवादी यांनी हेतूपुरस्सर पुरावा देण्यास टाळाटाळ केलेली आहे. प्रस्तुतकामी युक्तीवादासाठी पाच तारखा

नेमल्यानंतर प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज वादीला नाहक त्रास देण्यासाठी व दाव्याचे काम लांबणीवर पडावे म्हणून दिलेला आहे त्यामुळे तो खर्चासह नामंजूर करण्यास यावा, अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

४) प्रस्तुतचा दावा हा २० वर्षे जुना असून प्रस्तुत कामात रोजनाम्यावरुन वादी यांनी दि.०८/०७/२०१६ रोजी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले असून प्रस्तुत साक्षीदाराचा उलटतपासात प्रतिवादी यांनी दि. १४/११/२०१८ रोजी पुर्ण केल्याचे दिसून येते. तसेच दि. २८/११/२०१८ रोजी वादी यांनी त्यांचा पुरावा बंद केला. तद्नंतर प्रतिवादी यांनी त्यांचा पुरावा न दिल्यामुळे दि. ३०/०७/२०१९ रोजी न्यायालयाच्या आदेशाने प्रतिवादी यांचा पुरावा बंद करण्यात आल्याचे स्पष्ट होते. परंतु दि. १६/१०/२०१९ रोजी सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादी यांना पुरावा देण्याबाबत संधी देण्यात आली व दि.२३/०८/२०२३ रोजी प्रतिवादी यांनी त्यांचा पुरावा बंद करणेबाबतची पुरशीस दाखल केली. प्रस्तुतकामी प्रतिवादी यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांनी त्यांच्या संपूर्ण अर्जामध्ये त्यांनी वेळीच साक्षीदार क्र. ३ यांना साक्षीसमन्स काढणे करीता अर्ज सादर करुन सदरचे साक्षीदार तपासणेकरीता कोणती अडचण होती याचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांच्या अर्जामध्ये दिलेले नाही. तसेच प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये त्यांना कोणत्या मुद्दयावर साक्षीदार तपासायचा असून सदर साक्षीदार प्रस्तुतकामी कोणत्या मुद्दयाच्या आधारे गुणवत्तेवर अंतिम न्यायनिर्णय देण्याकरीता आवश्यक आहे हे नमूद केलेले नाही. मुलत: प्रतिवादी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे दि. २३/०८/२०२३ रोजी त्यांचा पुरावा बंद केल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दि. १०/०१/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. सदर विलंबाचे कारण देखील प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेले नाही. केवळ प्रतिवादी यांच्या अर्जातील कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय केलेल्या कथनांमुळे प्रस्तुतच्या जुन्या प्रकरणामध्ये अनेक दिवसांनी पुन्हा साक्षीसमन्स काढून पुन्हा सदरचे प्रकरण पुराव्याच्या स्थितीमध्ये आणणे न्यायोचित होणार नाही. करीता न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

निशाणी ३३५ येथील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.) SOURABH JAYKUMAR CHIVATE Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE Date: 2025.07.04 12:28:17 +0530

वेंगुर्ला. (एस.जे. चिवटे)
दिनांक – २५/०६/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वेंगुर्ला.